महाराष्ट्र शासन

**उपविभागीय दंडाधिकारी, मूल यांचे कार्यालय**

प्रशासकीय भवन, मूल, जिल्हा - चंद्रपूर

दूरध्वनी क्र.07174-221310 E-mail - sdomul@gmail.com

पत्र क्र./कावी/अ.का./प्रस्तु-1/उविदं/2023/ 268 दिनांक :- 30 /05/2023

# जाहीरनामा

## मुल उपविभागात रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरण्याबाबत जाहीरनामा जाहीरात

चंद्रपुर जिल्हयातील मुल उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील (मुल-सावली तालुक्यातील) गावात पोलीस पाटील पद भरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात फक्त ऑफ लाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | जाहीरनामा प्रसिध्द करणे | :- | 30 मे,2023 |
| 2. | परीक्षेकरीता ऑफलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | :- | 01 जुन2023 ते 15 जुन,2023 कार्यालयीन वेळेत |

**परिक्षा शुल्क खालील प्रमाणे ऑफ लाईन पध्दतीने भरावे लागेल.**

| | | |
|---|---|---|
| **खुला प्रवर्ग** | :- | **रुपये 500/-** |
| **आरक्षीत/आर्थीक दुर्बल घटक प्रवर्गासाठी** | :- | **रुपये 300/-** |

सरळसेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहीरात उपविभागीय अधिकारी कार्यालय,मूल , तहसिल कार्यालय,सावली/ मूल , ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येत आहे. अर्जदाराने संपुर्ण जाहिरनामातील प्रक्रिया काळजीपुर्वक समजुन घेवून ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. विहीत ऑफ लाईन पध्दतीने भरलेला अर्ज ग्राहय धरण्यात येईल. भरती प्रक्रीयेच्या अद्यावत माहीतीबाबत सुचना उपविभागीय अधिकारी कार्यालय,मूल , तहसिल कार्यालय,सावली/ मूल , येथे प्रसिध्द करण्यात येतील. तरी जागृत राहण्याची जबाबदारी संपुर्णत: अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद,तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, मुल यांनी राखुन ठेवले असुन त्यांचा निर्णय अंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**विविध प्रवर्गाच्या आरक्षणासाठी खालील प्रमाणे गांवे प्रस्तावित आहेत.**

| अ.क्र. | गावाचे नांव | प.ह.नं. | तालुका | पो.स्टे. | आरक्षणाचा प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | चक घोसरी | सा.क्र.- 27 | मूल | मूल | अनुसुचित जाती | महिला राखीव |
| 2 | डोनाळा माल | सा.क्र.- 22 | सावली | सावली | अनुसुचित जाती | |
| 3 | सिर्सी चक | सा.क्र.-21 | सावली | सावली | अनुसुचित जाती | महिला राखीव |
| 4 | सावंगी दिक्षीत | सा.क्र.-8 | सावली | पाथरी | अनुसुचित जाती | |
| 5 | केळझर | सा.क्र.- 15 | मूल | मूल | अनुसुचित जाती | |
| 6 | कोंडेखल | सा.क्र.- 13 | सावली | सावली | अनुसुचित जाती | |
| 7 | मानकापूर | सा.क्र.- 17 | मूल | मूल | अनुसुचित जमाती | महिला राखीव |
| 8 | काटवन चक | सा.क्र.- 12 | मूल | मूल | अनुसुचित जमाती | महिला राखीव |
| 9 | भानापूर | सा.क्र.- 8 | सावली | पाथरी | अनुसुचित जमाती | महिला राखीव |
| 10 | मानकापूर चक | सा.क्र.- 10 | सावली | सावली | अनुसुचित जमाती | |
| 11 | जनकापूर तुकूम | सा.क्र.- 6 | सावली | पाथरी | अनुसुचित जमाती | |
| 12 | बारसागड | सा.क्र.- 8 | सावली | पाथरी | अनुसुचित जमाती | |
| 13 | आसोला चक | सा.क्र.- 8 | सावली | पाथरी | अनुसुचित जमाती | |
| 14 | दहेगाव | सा.क्र.- 17 | मूल | मूल | अनुसुचित जमाती | |
| 15 | चितेगाव | सा.क्र.-9 | मूल | मूल | अनुसुचित जमाती | |
| 16 | चक बेंबाळ | सा.क्र.- 27 | मूल | मूल | अनुसुचित जमाती | |
| 17 | पिपरी दिक्षीत | सा.क्र.-27 | मूल | मूल | अनुसुचित जमाती | |
| 18 | केरोडा | सा.क्र.-13 | सावली | सावली | भटक्या जमाती (अ) | महिला राखीव |
| 19 | लोंढोली | सा.क्र.- 25 | सावली | सावली | भटक्या जमाती (अ) | |
| 20 | उसेगाव | सा.क्र.- 5 | सावली | सावली | भटक्या जमाती (अ) | |
| 21 | केशरवाही | सा.क्र.- 1 | सावली | सावली | भटक्या जमाती (अ) | |
| 22 | थेरगाव | सा.क्र.- 20 | सावली | पाथरी | भटक्या जमाती (ब) | |
| 23 | येजगाव | सा.क्र.- 25 | मूल | मूल | भटक्या जमाती (ब) | |
| 24 | साखरी | सा.क्र.-25 | सावली | सावली | भटक्या जमाती (ब) | महिला राखीव |
| 25 | बाबराळा | सा.क्र.- 29 | मूल | मूल | भटक्या जमाती (क) | |
| 26 | राजगड | सा.क्र.- 21 | मूल | मूल | भटक्या जमाती (क) | महिला राखीव |
| 27 | पेठगाव निलसनी | सा.क्र.- 23 | सावली | सावली | भटक्या जमाती (क) | |
| 28 | पेठगाव माल | सा.क्र.-21 | सावली | सावली | भटक्या जमाती (क) | |
| 29 | हळदी | सा.क्र.- 19 | मूल | मूल | भटक्या जमाती (क) | |
| 30 | दाबगांव मक्ता | सा.क्र.- 16 | मूल | मूल | भटक्या जमाती (ड) | महिला राखीव |
| 31 | निमगांव | सा.क्र.- 20 | सावली | पाथरी | भटक्या जमाती (ड) | |
| 32 | हिरापुर | सा.क्र.- 1 | सावली | सावली | भटक्या जमाती (ड) | |
| 33 | जिबगांव | सा.क्र.- 21 | सावली | सावली | विशेष मागास प्रवर्ग | महिला राखीव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 34 | किसाननगर | सा.क्र.- 11 | मावली | मावली | विशेष मागास प्रवर्ग | |
| 35 | चिरोली | सा.क्र.- 13 | मूल | मूल | इतर मागास प्रवर्ग | |
| 36 | उसरपार चक | सा.क्र.- 8 | सावली | पाथरी | इतर मागास प्रवर्ग | |
| 37 | मारोडा | सा.क्र.- 3 | मूल | मूल | इतर मागास प्रवर्ग | |
| 38 | सोनापुर | सा.क्र.- 15 | सावली | सावली | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| 39 | सायखेडा | सा.क्र.- 6 | सावली | पाथरी | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| 40 | खानाबाद | सा.क्र.- 7 | सावली | पाथरी | इतर मागास प्रवर्ग | |
| 41 | विहिरगांव | सा.क्र.- 16 | सावली | पाथरी | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| 42 | गेवराखुर्द | सा.क्र.- 7 | सावली | पाथरी | इतर मागास प्रवर्ग | |
| 43 | पारडी | सा.क्र.- 4 | सावली | सावली | इतर मागास प्रवर्ग | |
| 44 | हरांबा | सा.क्र.- 24 | सावली | सावली | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| 45 | कोरंबी | सा.क्र.-29 | मूल | मूल | इतर मागास प्रवर्ग | |
| 46 | भादुर्णा | सा.क्र.- 4 | मूल | मूल | इतर मागास प्रवर्ग | |
| 47 | उथळपेठ | सा.क्र.-17 | मूल | मूल | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| 48 | चकदुगाळा | सा.क्र.- 25 | मूल | मूल | इतर मागास प्रवर्ग | |
| 49 | सिर्सी माल | सा.क्र.- 21 | सावली | सावली | इतर मागास प्रवर्ग | |
| 50 | भट्टीजांब | सा.क्र.- 5 | सावली | सावली | इतर मागास प्रवर्ग | |
| 51 | बोंडाळा खुर्द | सा.क्र.- 31 | मूल | मूल | इतर मागास प्रवर्ग | |
| 52 | आकापुर | सा.क्र.- 7 | सावली | पाथरी | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| 53 | कांतापेठ | सा.क्र.- 14 | मूल | मूल | खुला प्रवर्ग | |
| 54 | आगडी | सा.क्र.- 14 | मूल | मूल | खुला प्रवर्ग | |
| 55 | येरगांव | सा.क्र.- 26 | मूल | मूल | आर्थिक दुर्बल घटक | |
| 56 | भान्सी | सा.क्र.- 23 | सावली | सावली | आर्थिक दुर्बल घटक | महिला राखीव |

## पोलीस पाटील पदाकरिता किमान आवश्यक अर्हता :-

1. अर्जदार हा दहावी परिक्षा (एस.एस.सी) पास असावा.
2. अ) वयोमर्यादे करीता अर्जदाराचे दिनांक 29/05/2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

   ब) अर्जदाराचे वय दिनांक 29/05/2023 रोजी 25 वर्षापेक्षा कमी नसावे व 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.

   क) पोलीस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.
3. अर्जदार हा स्थानिक रहिवासी असावा.अर्जदाराने राशनकार्ड ,निवडणूक ओळखपत्र,आधारकार्ड व ज्या पुराव्याने स्थानिक रहिवासी असल्याचे शिध्द होते. असा कोणताही एक पुरावा मुलाखतीच्या वेळी सादर करावा.
4. अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा मोबाईल नंबर नमुद करावा.
5. अर्जदार शारीरीक दृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चरित्र निष्कलंक असणे आवश्यक आहे.

6. महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे अर्जदारास आवश्यक राहील.(अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत)
7. मागास प्रर्वगासाठी आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच आर्थिक दुर्बल घटकाकरीता सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले EWS प्रमाणपत्र आवश्यक राहिल.
8. इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, वि.जा.अ तसेच भ.ज ब,क,ड या प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2022-23 या कालावधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती गट (क्रिमिलेअर ) यामध्ये मोडत असल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर ) प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**परिक्षेचे स्वरुप :-**

**परिक्षेचे गुण**

| लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा (मुलाखत ) | एकुण गुण |
|---|---|---|
| 80 | 20 | 100 |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालीलप्रमाणे राहील :-**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणाची असेल प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहिल.
2. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची राहील.
3. लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस.एस.सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल यात सामान्य ज्ञान, गणित,पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती व चालु घडामोडी इत्यादी विषयांचा समावेश असेल.
4. लेखी परिक्षेत एकुण 80 गुणापैकी किमान 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारामधील उच्चतम गुण व एका पदासाठी पाच उमेदवारांना गुणवत्ता यादीनुसार पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परिक्षा घेण्यात येईल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रनिम/2010/2009/प्र.क्र.10-13/अ, दिनांक 16/6/2010 मधील तरतूदीनुसार लेखी परिक्षा घेते वेळी उत्तरपत्रिकेवर उत्तर लिहीन्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बालपेन वापर करावा लागेल.

निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती

1. प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदाराचे शैक्षणिक पात्रता व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्र तपाणीसाठी मुलाखतीच्या दिवसी उपलब्ध करुन दयावी लागतील. अन्यथा तोंडी परिक्षेकरीता अर्जदाराचा विचार केला जाणार नाही.
2. लेखी परिक्षा,तोंडी परिक्षा, कागदपत्रे छाननी, प्रवेशपत्र, वेळापत्रक व विविध सुचना उपविभागीय अधिकारी कार्यालय, मूल, तहसिल कार्यालय, मूल / सावली येथे उपलब्ध करुन दिल्या जातील.भरती प्रक्रीयेतील माहिती /कार्यक्रमाबाबत अद्यावत व सजग राहण्याची तसेच प्रवेशपत्र प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संपुर्णत: अर्जदाराची राहील.
3. जाहीरातीनुसार लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदाराचे आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहिर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहिराती नुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती,परिक्षा शुल्क,कागदपत्राच्या आधारे परिपुर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्यात रद्द होवू शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
4. अर्जदार शारिरीक दृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतिच निश्चित करण्यात येईल.
5. अर्जदाराचे चारीत्र निष्कलंक असल्याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे चारीत्र प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6. अर्जदाराचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा त्याचप्रमाणे तो ईतर ठिकाणी पुर्णवेळ नौकरी करणारा नसावा तसेच तो स्थानिक स्वराज्यसंस्थेचा खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.
7. पोलीस पाटील पदावरील नियुक्ती करीता मृत/सेवानिवृत्त पोलीस पाटलाच्या वारसानांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यत येईल.परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position )पोलीस

पाटलाच्या वारसासह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलाच्या वारसाची निवळ करण्यास प्राधान्य देण्यात येईल.परंतु तो महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील (सेवा, प्रवेश पगार भत्ते आणि सेवेच्या ईतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गांवासाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक/समांतर आरक्षणाचा असला पाहीजे.

8. अर्जदार संबंधित गावाचा स्थानिक रहीवासी असणे आवश्यक आहे.
9. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक /कायमचा रहीवाशी असु शकतो सबब अर्जदाराने अश्याच एका गावात अर्ज करावा.एकापेक्षा अधिक गावातुन केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.
10. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षीत करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासुण अर्ज करावा. आरक्षण व्यतीरिक्त इतर उमेदवारांनी अर्ज करु नये.
11. मुल उपविभागातील रिक्त पदाच्या सर्व गांवासाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल. संपुर्ण भरती प्रक्रीया गांवनिहाय होणार असुन कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रीयेचा एकामेकाशी संबंध नसेल.
12. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही तसेच पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्थरावर(Field Work)काम करावे लागते.त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारीरीक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे.त्यामुळे त्यांना अंपगासाठीचे आरक्षण लागु करण्यात आलेले नाही.
13. पोलीस पाटील हे पद एका गांवात एकच असते त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त,माजी सैनिक,खेडाळु या सारखी संमातर आरक्षणे लागु होत नाहीत.
14. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसुचना क्र.एस.आर.व्ही.2000/प्र.क्र.17/2000/ 12 दिनांक 27/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांनेही विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.
15. लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल.

16. समान गुण मिळाल्यास अंतिम निवड शासन निर्णय क्र. डीव्हीपी -1113/176/प्र.क्र.592/पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्या प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

17. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय,परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

18. हा जाहीरनामा/जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांमाठी कोणत्याही प्रकाराचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत असे समजण्यात येईल.

ऑफलाईन (Off line) अर्ज करण्याची पध्दत :-

1. पोलस पाटील भरतीबाबत अर्ज उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, मुल येथून प्राप्त करू घ्यावे.
2. उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयात कार्यालयीन दिवसी दररोज सकाळी 11.00 ते 5.00 वाजेपावेतो अर्ज स्विकारण्यात येतील. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाही.
3. अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनुसार संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारांस कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही याची नोंद घ्यावी.
4. अर्जदार यांनी ऑफलाईन फार्म भरतांना गावाचे नाव,आरक्षण,याची खात्री करुन अर्ज भरावे. अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.
5. उमेदवारांनी परिक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणने आवश्यक आहे.
6. उमेदवारांची लेखी परिक्षा ही त्यांनी अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी /छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. उमेदवारांनी अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्राच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार पोलीस पाटील पद भरती निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

7. उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,मूल येथून परिक्षेचे प्रवेशपत्र विहीत वेळेसत प्राप्त करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोस्टाव्दारे प्रवेशपत्र (Hall Ticket) पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

8. लेखी परिक्षा झाल्यावर तीन तासाने आदर्श उत्तरपत्रिका प्रकाशित केली जाईल.लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये कोणताही प्रश्न चुकीचा आढळल्यास लेखी परिक्षेच्या दिवशी सायंकाळी 05.00 वाजे पर्यंत त्याबाबत लेखी आक्षेप पोलीस पाटील निवड समिती उपविभाग,मुल यांचेकडे नोंदवावे लागेल.याबाबत उपविभागीय दंडाधिकारी मुल तथा अध्यक्ष पोलीस पाटील निवड समिती यांचा निर्णय अंतिम राहील.

दिनांक:-30 /05/2023

ठिकाण:- मुल

(डॉ. रविंद्र होळी)
उपविभागीय दंडाधिकारी,मुल तथा
अध्यक्ष पोलीस पाटील भरती- 2023
निवड समिती,मुल

प्रतिलीपी-1 मा.जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांना माहीती करीता सविनय सादर.

2.मा.पोलिस अधिक्षक,चंद्रपुर यांना माहीती करीता सविनय सादर.

3.उपविभागीय पोलिस अधिकारी,मुल यांना माहितीस अग्रेषित.

4.तहसिलदार,मुल/सावली यांना माहितीस अग्रेषित.

5.गटविकास अधिकारी,पंचायत समिती मुल/सावली यांना माहितीस अग्रेषित.

6. पोलिस निरीक्षक,मुल/सावली/पाथरी यांना माहितीस अग्रेषित.

अ.क्र.3 ते 6 यांनी सदरच्या जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर दर्शनी भागात प्रसिध्दी करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास समक्ष सादर करावा. तसेच तहसिलदार यांनी सदर जाहीरनाम्याची प्रत संबंधित तलाठी यांना तलाठी कार्यालयात प्रसिध्द करण्याबाबत व गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्याबाबत सुचना देवुन प्रसिध्द केल्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. रविंद्र होळी)
उपविभागीय दंडाधिकारी,मुल तथा
अध्यक्ष पोलीस पाटील भरती- 2023
निवड समिती,मुल